मोटार वाहन विभाग, पुणे महानगरपालिका
कार्यकारी अभियंता, (यांत्रिकी) यांचे कार्यालय
जावक क्र.:-यांत्रिकी/मोवावि ५८६
दिनांक : - २०/५ /२०२१

**--: कार्यालयीन परिपत्रक :--**

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडे विविध प्रकारची विविध मेकची सुमारे १३५८ वाहने आहेत. पुणे महानगरपालिकेची वाढती हद्द व हद्दी मध्ये समाविष्ट होणारी नविन गावे तसेच दर वर्षी शहरात होणारी विविध विकास कामे लक्षात घेता सद्य स्थितीमध्ये असणारी वाहने अपुरी पडत असल्याने गत अनेक वर्षापासून टुरिस्ट परवाना असलेली मारुती व्हॅन (इको) या संवर्गातील वाहने भाडेतत्वावर घेण्यात येतात.

सबब भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली मारूती इको संवर्गातील वाहने घेणेकामी महाटेंडर या प्रणालीद्वारे जाहिर ऑनलाईन निविदा क्र. ८७/२०२०-२०२१ मागविण्यात आली असून यामधील मे. ईगल कार्स, पुणे यांनी सदर निविदेकरीता सर्वात कमी दर दिले आहे. तथापि मे. ईगल कार्स, पुणे यांनी आमच्या फर्म कडून ऑनलाईन निविदा दर सादर करताना नजरचुकीने जादा (+) ऐवजी कमी (-) असा दर सादर केला गेला आहे. या दराने सध्याची डिझेल भाववाढ, लेबर (ड्रायव्हरचा पगार), वाहनांची देखभाल दुरूस्ती याचा विचार करता ऑनलाइन सादर केलेल्या दराने म्हणजेच (-९.३२% कमी) या दराने काम करण्यास तयार नाही असे मोटार वाहन विभाग आ.क्र. मोवावि/६२५३ दि. २६/०३/२०२१ चे पत्रानुसार कळविले आहे.

सबब टुरिस्ट परवाना असलेली इको संवर्गातील वाहने भाडेतत्वावर घेणेकामी मागविण्यात आलेल्या निविदेकरीता सर्वात कमी दर सादर करणाऱ्या मे. ईगल कार्स, पुणे यांनी सदरचे काम करणेस नकार दिल्याने मनपाच्या कामकाजामध्ये अडथळे निमाण झाल्याने मा. अति. महापालिका आयुक्त (इ) ठराव क्र. १०/१३२ दि.१८/०५/२०२१ नुसार या निविदेकरीताची मे. ईगल कार्स, पुणे यांची बयाणा रक्कम जप्त करणेस व शासन निर्णय सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि. २९/०१/२०१९ मधील अ. क्र. ७ चे आदेशान्वये मे. ईगल कार्स, पुणे यांना कोणत्याही निविदेत एक वर्षाकरीता भाग घेण्यास प्रतिबंध करण्यात यावे असे आदेश दिले आहेत.

**सबब मे. ईगल कार्स, पुणे यांना यापुढे मनपाकडील सर्व निविदामधून करावयाच्या कामाकरीता एक वर्षाकरीता प्रतिबंधीत करण्यात येत आहे.**

तरी, मे. ईगल कार्स, पुणे यांना यापुढे मनपाकडील सर्व निविदामधून कोणत्याही प्रकारची नव्याने कामे देण्यात येऊ नयेत. याबाबत सर्व खातेप्रमुखांनी दक्षता घ्यावयाची आहे.

(डॉ. महेश कुमार डोईफोडे)
उप आयुक्त
मोटार वाहन विभाग
पुणे महानगरपालिका